# प्राणाचार्य चारकांची जीवन गौरवगाथा

– प्रा. प्रिती चांदू बिस्मिले

आपला भारत देश खूप प्राचीन आहे. येथे खूप महान वैद्य आणि शास्त्रज्ञ होऊन गेले. यामध्ये एक चरक नावाचे वैद्य होते. तयांचा प्रामुख्याने आयुर्वेदाशी संबंध आहे. असं मानलं जात की, ब्रह्मांडाच्या निर्मात्यांनी ऋषीमुनींना मानवजातीच्या कल्याणासाठी आयुर्वेदिक चिकित्सेचे पूर्ण ध्यान दिले गेले. नंतर या ऋषीमुनींच्या द्वारे त्यांचे शिष्य व सामान्य माणसांना या जडी–बुटी आणि औषधीचे महत्व व उपयोग (उपचार पद्धती) लिखित तसेच मौखिक स्वरूपात सांगण्यात आले. या रचित स्वरूपालाच ' श्लोक ' असे सम्बोधतात आणि हे श्लोक ज्या ग्रंथामध्ये संग्रहित केले गेले आहेत त्यांना ' वेद ' म्हणतात. ते एकूण चार प्रकारचे आहेत – यजुर्वेद, ऋग्वेद, सामवेद आणि अथर्ववेद. त्यात ऋग्वेद आणि अथर्ववेद खूप प्रसिद्ध आहेत. या दोन वेदांचे लेखन ऋषी अत्रेय द्वारा केले गेले आणि अग्निवेश यांनी वेदांपासून आयुर्वेदाचे ज्ञान एकत्रित केले व ' चरक ' आणि काही विद्वानांनी हे ज्ञान संपादन केले. आचार्य चरक यांनी या ज्ञानाला चरक संहितेच्या रूपात प्रति–संस्कारित केले आणि वर्तमानात याचेच आपण चरक संहितेचता स्वरूपात अनुसरन करत आहोत. चरक संहिता आयुर्वेदिक चिकित्सेच्या सर्व बाजूंचे वर्णन करते.

इ . स . पूर्व ३०० – २०० आयुर्वेदाचे आचार्य महर्षी चरक यांची गणना भारतीय औषधी विज्ञानाच्या मूळ प्रवर्तकांमध्ये होतो आचार्य महर्षी चरक यांना ' आयुर्वेदाचे जनक ' असे संबोधले जाते. महर्षी चरक यांचे शिक्षण तक्षशिला मध्ये पूर्ण झाले. काही विद्वानांच्या मतानुसार आचार्य चरक हे कनिष्क राज्याचे राजवैद्य होते परंतु काही विद्वान यांना बौद्ध काळाच्या पूर्वीपासून मानतात. त्रिपिटकच्या चिनी भाषांतरात आचार्य चरक हे कनिष्क राज्याचे राज वैद्ये होते असा उल्लेख आहे.

आचार्य चरक यांच्या नावाची पण खूप मजेशीर गोष्ट आहे. त्यांना जनसेवा करण्यात खूप रुची होती म्हणून ते फिरत – फिरत चिकीत्सा विज्ञानाचा प्रचार प्रसार करत म्हणून त्यांचे नाव चरक असे पडले. आचार्य चरक यांनी पहिल्यांदा आयुर्वेदिक उपचारात शरीर विज्ञान, निदान शास्त्र आणि भ्रूण विज्ञानावर पुस्तक

लिहिले त्यालाच आपण चरक संहिता असे संबोधतो. आज ही आयुर्वेदात या पुस्तकाला खूप मान सन्मान दिला जातो व पुढील अध्ययनासाठी ही आधार घेतला जातो. चरक संहितेमध्ये रोग नाशक आणि रोग प्रती कारक औषधींचा उल्लेख केला आहे. तसेच ' सोने, चांदी, पारा आणि लोह अश्या धातूंच्या भस्मांचा उपयोग ' याचे विस्तृत असे वर्णन केले आहे. चरक म्हणत असत कि फक्त जे चिकित्सक आपले ज्ञान आणि विचारांचा दिवा घेऊन रोग्याच्या शरीराचा अभ्यास करत नाही, तो रोगाला कसे बरे करणार? म्हणून चरक म्हणत उपचाराच्या सुरवातीलाच रोगाच्या सगळ्या कारनांचा अभ्यास करायला हवा ,जे रोग्याला प्रभावित करतात आणि नंतर त्याचे उपचार करणे गरजेचे आहे. चरक ठामपणे म्हणत फक्त इलाज नाही तर रोगापासून बचाव हे देखील महतवपूर्ण आहे. चरक हे पहिले असे वैद्य होते ज्यांनी पचन , चयपचन आणि शरीर प्रति-सुरक्षा चा अभ्यास केला. त्याचा नुसार शरीरात पित्त, कफ आणि वात यांच्या असंतुलनाने दोष निर्माण होतात हे देखील सांगीतले आणि हे सर्व आपल्या रोजच्या आहारावर अवलांबून आहे असे स्पष्ट केले. चरक यांनी काही गोष्टी सिद्ध करून दाखविल्या जसे कि सारख्या प्रमणात घेतलेला आहार वेग-वेगळ्या शरीरात वेग-वेगळे दोष निर्माण करतात. म्हणजेच प्रत्येक शरीर, दुसऱ्या शरीरा पासून वेगळे असते. आणि शरीरात रोग निर्माण होण्याचे मूळ कारण हे तीन दोष आहेत. याचं संतुलन बिघडलं तर रोग निर्माण होतात आणि तयासाठी त्यांनी औषधी देखील निर्माण केली. आठव्या शतकात चरक संहिता अरबी भाषेत अनुवादित केला गेला आणि हे शास्त्र पश्चिमी देशात पोहचवले.

चरक संहितेचे महत्त्व : चरक संहिता हा सर्वाधिक प्राचीन ग्रंथांपैकी एक ग्रंथ आहे. आरबीचे प्रसिद्ध इतिहासकार या विद्वान अल-बरूनी यांनी असे एक विधान केले होते कि '' हिंदूंचे औषध विज्ञानातील चरक संहिता हे सर्वश्रेष्ठ पुस्तक आहे''. संस्कृत भाषेत लिहलेले हे पुस्तक, १२० अध्याय मध्ये विभाजित केले गेले आहे, ज्यात १२ हजार श्लोक आणि दोन हजार औषधींचा समावेश आहे.

- सूत्र स्थानी - आहार विहार, पथ्य-अपथ्य शारीरिक आणि मानसिक रोगांच्या चिकित्सेचे वर्णन केले आहे.
- निदान स्थानी - रोगांची करणे ओळखून आठ प्रमुख रोगांची माहिती दिली आहे.
- विमान स्थानी - स्वादिष्ट, रुचकर, पौष्टिक आहाराचं उल्लेख आहे.
- शरीर स्थानी - मानवाच्या शरीराची रचना, गर्भात बाळाच्या विकासाची प्रक्रिया तसेच त्याच्या अवस्थांचे महत्व सांगितले आहे.

□ इंद्रिय स्थानी – रोगांवर उपचाराच्या पद्धतीचे केलेले दिसून येते.

□ चिकित्सा स्थानी – काही विशेष रोगांचा इलाज दिला आहे.

□ कल्प स्थानी – साधारण इलाज.

□ सिद्धी स्थानी – काही सामान्य रोगांची माहिती.

चरक संहिता हि आचार्य चरक द्वारा लिहलेले सर्वात श्रेष्ठ पुस्तक आहे तसेच चरक संहितेला आयुर्वेदातील सर्वोत्तम कृती मनाली जाते व आयुर्वेदाच्या अभ्यासासाठी प्रामुख्याने चरक संहितेचा आधार घेतला जातो.

विकारनामाकूशलो न जीह्लीयात कदाचन ।
न हि सर्वविकाराणा नामतोडस्ति ध्रुवा स्थिती: ।।

चरक संहितेचा अध्यान्त अध्ययन केल्याशिवाय शरीर चिकित्सेचा संपूर्ण ज्ञानाची प्राप्ती कठीण च नाही तर अशक्य आहे हे म्हणणं अतीश्योकति होणार नाही, की कुशल शरीर चिकित्सक होण्यासाठी चरक संहितेच्या वाक्य ना वाक्याचा सखोल आणि प्रदीर्घ अभ्यास करणे अनिवार्य आहे. या चरक संहितेत रोग आणि रोगांचे निवारण यांवर सिद्धांत तसेच प्रायोगिक वर्णन जितके विस्तृत स्वरूपात आढळते तेवढे अन्यत्र कोठेही आढळून येत नाही.

**संदर्भ –**


१. हेन बी।भालू और सह; वरमोंट: १९९०। आयुर्वेद : प्राकृतिक चिकित्सा और जीवन विस्तार कि प्राचीन भारतीय कला, आंतरिक परंपराए।

२. मुकर्जी पी., ह्युटन पी. हर्बल उत्पादो के बढते उपयोग कि विश्वव्यापी घटना : अवसर और खतरे। इन : ह्युटन पीजे , मुकर्जी पीके, संपादक। गुणवत्ता, सुरक्षा और प्रभावकारिता पार हर्बल औषधीय उत्पादो – परिप्रेक्षो का मूल्यांकन। फार्मास्युटिकल प्रेस, रॉयल फार्मास्युटिकल सोसायटी ऑफ ग्रेट ब्रिटन ; २००९.

३. सिन्ह जे., बागची जी., खनूजा एसपीके, संपादक । --------- आर, मुखर्जी, वानस्पतिक के लिये जीएमपी। बिजनेस होराइजन्स लिमिटेड ; नई दिल्ली: २००३। आयुर्वेदिक और हर्बल तैयारीयों का निर्माण और गुणवत्ता नियंत्रण ।

४. शर्मा एस, संपादक। आयुर्वेद के क्षेत्र। अर्नोल्ड – हेनमैन ; नई दिल्ली: १९७९.

५. अनाम। चौखंभ विश्वभारती; वाराणसी, भारत: २००१। सुश्रुत संहिता – शरीर स्थानम।